**पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती दरात, संचात वाढ व सुधारणा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
शासन निर्णय क्र. एससीएच- २००९/(९०/०९)/ केंपुयो,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक - २२ जुलै, २०१०

**संदर्भ** -१) शासन निर्णय शिक्षण विभाग क्रमांक : एसएसजी/ १३५३, दिनांक २ एप्रिल, १९५४.
२) शासन निर्णय शिक्षण समाजकल्याण विभाग क्रमांक : एसएसएन १७६४/ई, दिनांक २३ एप्रिल, १९६५.
३) शासन निर्णय शिक्षण समाजकल्याण विभाग क्रमांक : एसएसएन १७६६/ई, दिनांक १९ मे, १९६५.
४) शासन निर्णय शिक्षण समाजकल्याण विभाग क्रमांक : एसएसएन १७६८/८२४४१/(आय)/ई, दिनांक १९ मे, १९७०.
५) शासन निर्णय शिक्षण व सेवा योजन विभाग क्रमांक : एचएमएस १०८०/२१५९३२/(९०५)/साशि ५, दिनांक २२ जून, १९८२.
६) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक :एससीएच १०९०/ २१३५५९/(१७७/९०)/माशि ७, दिनांक २४ एप्रिल, १९९१ व १ ऑगस्ट, १९९२.
७) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक :एससीएच १०९१/१०२८२०/(२१/९१)/माशि ७, दिनांक ३ फेब्रुवारी, १९९२
८) शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्रमांक : एससीएच १०९३/ ( ३७९/९३)/माशि ८, दिनांक २ फेब्रुवारी, १९९४
९) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक: एससीएच १०९३/ (२२५/९३)/माशि ८, दिनांक ३० मार्च, १९९४.
१०) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक : शिष्यवृत्ती- १९९४-९५/ २१ ई/सा.शि, दिनांक ८ फेब्रुवारी, १९९५ चा प्रस्ताव व दि. २२ जून, १९९५ चे पत्र.
११) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक: एससीएच १०९५/(५१/९५)/ माशि ८, दिनांक २ ऑगस्ट, १९९५.

**प्रस्तावना** -

पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळांतील गुणवान विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती देण्याची योजना शासन निर्णय दिनांक २ एप्रिल, १९५४ अन्वये सन १९५४-५५ पासून कार्यान्वित आहे. या शिष्यवृत्तीची परिक्षा इयत्ता ४ वी व ७ वी साठी घेतली जाते. महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परिक्षेत गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांना मंजूर संचाच्या अधिन राहून या योजनेचा लाभ दिला जातो. ही शिष्यवृत्ती समाधानकारक प्रगती व चांगली वर्तणूकीच्या आधारे पुढे चालू राहते. शिष्यवृत्तीच्या प्रचलित दरामध्ये व संचामध्ये शासन निर्णय दिनांक १४ फेब्रुवारी, २००७ नुसार सन २००६ - ०७ या शैक्षणिक वर्षापासून पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (इयत्ता ५ वी ते

इयत्ता ७ वी ) दर रुपये ७५/- दरमहा व माध्यमिक शिष्यवृत्ती (इयत्ता ८ वी ते इयत्ता १० वी ) दर रुपये १००/- दहमहा (दहा महिन्यांसाठी ) अशी वाढ करण्यात आली आहे . पूर्व माध्यमिक शिष्यवृत्तीचे ७९०८ व माध्यमिक शिष्यवृत्तीचे ७६२८ संच मंजूर आहेत. राज्य शिष्यवृत्ती परिक्षेला विशिष्ट दर्जा असून शिष्यवृत्ती मिळणे ही प्रतिष्ठेची बाब मानली जाते. "पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती "ही शिष्यवृत्ती गुणवान विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहनात्मक देण्यात येत असल्यामुळे अशा बक्षिसरुपी रकमेमध्ये व संचात वाढ करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:-**

सन २००९-१० या शैक्षणिक वर्षापासून पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळा खुली गुणवत्ता शिष्यवृत्तीच्या जे व के संच दरात पुढीलप्रमाणे वाढ करण्यात येत आहे.

| | **प्रचलित दर** | **सुधारित मंजूर दर** |
|---|---|---|
| **पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती** | | |
| **इयत्ता ५ वी ते ७ वी** | **रु.७५/- दहमहा** | **रु. १००/- दहमहा** |
| **माध्यमिक शिष्यवृत्ती** | | |
| **इयत्ता ८ वी ते १० वी** | **रु. १००/- दरमहा** | **रु.१५०/- दरमहा** |

वरील प्रमाणे शिष्यवृत्ती दर मंजुर करताना पूर्व माध्यमिक/ माध्यमिक शिष्यवृत्तीचे संच १०,००० लोकसंख्येस ३ शिष्यवृत्ती संच या प्रमाणे निकष लावावा. लोकसंख्येचे प्रमाण सन २००१ च्या जनगणनेनुसर प्रमाणित मानूण सोबतचे प्रपत्र "अ" "ब" "क""ड" व "इ" नुसार जिल्हानिहाय (ग्रामीण व शहरी ) संच मंजूर करण्यात येत आहेत.

पूर्व माध्यमिक, माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून देय राहील.

१) शासनमान्य (शासकीय/ अनुदानित/ विना अनुदानित/ कायम विनाअनुदानित )शाळांमधील विद्यार्थी सदर शिष्यवृत्ती परिक्षा देण्यास पात्र राहतील.

२) आय.सी.एस.ई. व सी.बी.एस.ई. अभ्यासक्रम राबविण्याऱ्या शाळांतील विद्यार्थ्यांसाठी, सदर शिष्यवृत्ती परिक्षेस प्रविष्ठ होण्यासाठी शासन खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देत आहे :-

अ) सदर परिक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रचलित नियमानुसार वयाची अट राहील.

ब) सदर विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्ती परिक्षेस सध्या प्रचलित असलेले विहित शुल्क आकारण्यात येईल.

क) महाराष्ट्र शासन अंतर्गत राबविणाऱ्या शाळांतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना असलेली परिक्षा फी माफीची सवलत या विद्यार्थ्यांना मिळणार नाही.

ड) सदर विद्यार्थ्यांची स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार केली जाईल.

इ) सदर विद्यार्थी गुणवत्ता यादीत आल्यास पहिल्या ५० विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाईल व गुणानुक्रम कळविण्यात येईल. मात्र त्यांना शिष्यवृत्तीची रोख रक्कम दिली जाणार नाही.

ई) उर्वरित सर्व विद्यार्थ्यांना गुणपत्रके देण्यात येतील.

३) <u>शिष्यवृत्ती परीक्षेसाठी पात्रता</u> -

शिष्यवृत्ती परिक्षेस पात्र होण्यासाठी विद्यार्थी हा महाराष्ट्राचा रहिवासी म्हणजेच पालकांचे किंवा विद्यार्थ्यांचे महाराष्ट्रात किमान १५ वर्षे वास्तव्य असावे.

४) <u>शिष्यवृत्ती परिक्षेसाठी वयोमर्यादा</u> -

विद्यार्थ्यांचे १ जून रोजी खाली दर्शविलेल्या कोष्टकापेक्षा जास्त नसावे.

| | पूर्व माध्यमिक शाळा | | माध्यमिक शाळा | |
|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | मुले | मुली |
| | वर्षे | वर्षे | वर्षे | वर्षे |
| बिगर मागासलेल्या वर्गासाठी | १२ | १२ | १५ | १५ |
| मागासलेल्या वर्गासाठी | १४ | १५ | १७ | १८ |

५) सदर शिष्यवृत्ती महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांनी दरवर्षी घेतल्या गेलेल्या स्पर्धा परिक्षेच्या आधारे दिली जाईल.

६) <u>परिक्षेची तारीख व दिनांक</u> -

अ) शिष्यवृत्ती परिक्षा दरवर्षी फेब्रुवारी महिन्याच्या तिसऱ्या रविवारी घेण्यात यावी.

ब) शिष्यवृत्ती परिक्षा महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेने निश्चित केलेल्या केंद्रावर घेतली जाईल.

७) <u>अर्ज -</u>

सदर परिक्षेसाठीचे अर्ज हे विद्यार्थी शिकत असलेल्या शाळेच्या मुख्याध्यापकांमार्फत महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेने ठरविलेल्या वेळापत्रकानुसार सादर करावेत.

८) परिक्षा शुल्क -

शासनाने वेळोवेळी ठरवून दिल्याप्रमाणे विद्यार्थ्यांच्या आवेदन पत्रासोबत परिक्षा शुल्क पाठविण्यात यावे. अर्ज नाकारल्यास परिक्षा शुल्क संबंधितास परत करण्यात येईल. अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती, भटक्या जाती- विमुक्त जमातीच्या विद्यार्थ्यांना परिक्षा शुल्क माफ असेल. तथापि, त्यांना आवेदन पत्राची किंमत भरावी लागेल. आवेदन पत्र स्विकारण्याची मुदत संपल्यानंतरही परिक्षा परिषदेकडे आवेदन पत्र विलंबाने पोहचल्यास व विलंबास विद्यार्थी जबाबदार असल्यास प्रति विद्यार्थी एकत्रित रु. ५०/-, व विलंबास विद्यालय/ संस्था जबाबदार असल्यास एकत्रित रु. १००/- विद्यालय/ संस्थेकडून वसूल करुन परिषदेकडे जमा करावेत.

९) परिक्षेचे माध्यम -

मराठी/ हिंदी/ गुजराथी/ उर्दू/ इंग्रजी/ सिंधी/ तेलगू/ कन्नड असे असेल.

१०) परिक्षेचे विषय

अ) पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परिक्षा ( इयत्ता ४ थी ) -

I) भाषा - अ) प्रथम भाषा ७० गुण + इंग्रजी भाषा ३० गुण (इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त)

ब) इंग्रजी माध्यम- इंग्रजी १०० गुण (या माध्यमासाठी व्दितीय भाषा नाही. )

II) गणित व सामाजिक शास्त्रे- गणित ७० गुण + सामाजिक शास्त्रे ३० गुण

III) बुध्दीमत्ता चाचणी - बुध्दीमत्ता चाचणी ७० गुण + सामान्य विज्ञान ३० गुण

वरील विषयांच्या प्रश्नांची काठिण्य पातळी, कठीण प्रश्न १०% मध्यम प्रश्न २०% व सोपे प्रश्न ७०% अशी राहील.

ब) माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ७ वी )

I) भाषा -अ) प्रथम भाषा ८० गुण+ इंग्रजी भाषा २० गुण (इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त)

ब) इंग्रजी माध्यम- इंग्रजी ८० गुण + मराठी (व्दितीय भाषा) - २० गुण

II) गणित - गणित ७० गुण + सामाजिक शास्त्रे ३० गुण

III)बुध्दीमत्ता चाचणी - बुध्दीमत्ता चाचणी ७० गुण + सामान्य विज्ञान ३० गुण

वरील विषयांच्या प्रश्नांची काठिण्य पातळी, कठिण प्रश्न ३०%, मध्यम प्रश्न ३०% व सोपे प्रश्न ४०% अशी राहील.

११) <u>शिष्यवृत्ती प्रदानाच्या अटी -</u>

अ) शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांने लगेचच्या वर्षी मान्यता प्राप्त प्राथमिक/ माध्यमिक शाळेत प्रवेश घेतला पाहीजे. जे शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी शाळेत प्रवेश घेणार नाहीत अशा विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रद्द करण्यात येईल.

ब) शिष्यवृत्ती परिक्षा पास झाल्याच्या नंतरच्या वर्षापासून तीन वर्षे सदर शिष्यवृत्ती चालू राहील. त्यासाठी शिष्यवृत्तीधारकाला नियमित उपस्थिती, चांगले वर्तन व समाधानकारक प्रगती या अटीची पूर्तता करावी लागेल. तसे शाळा प्रमुखाचे प्रमाणपत्र द्यावे लागेल. यापैकी एकाही अटीची पूर्तता होत नसल्यास पात्र विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती मिळणार नाही.

क) विद्यार्थ्यांने शाळा बदल केल्यास, विद्यार्थ्यांने / पालकांने शिष्यवृत्तीसाठी नवीन मुख्याध्यापकामार्फत संबंधित जिल्हयाच्या शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे प्रस्ताव सादर करावा.

ड) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांच्या परवानगीशिवाय कोणीही शिष्यवृत्ती गोठवू शकणार नाही.

१२) <u>शिष्यवृत्ती वितरण</u> -

लाभार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ ३ वर्ष दिला जात असल्याने साधारण २० ऑक्टोबर या एकाच दिवशी शिष्यवृत्तीधारक लाभार्थ्यांना बॅकेमार्फत शिष्यवृत्ती देण्यात यावी. शिष्यवृत्तीसाठी पात्र झालेल्या विद्यार्थ्यांचे बँक खाते उघडण्याची जबाबदारी संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची राहील. शिष्यवृत्ती परिक्षेच्या निकालानंतर प्रत्येक तालुक्यात १० सप्टेंबर या एकाच दिवशी शिबीर आयोजित करुन चालू व गत वर्षाच्या लाभार्थ्यांची बँक खात्याची माहिती तालुकानिहाय, प्रकारनिहाय, शाळानिहाय संकलित करावी व सदर माहिती विहित वेळेत शिक्षण अधिकारी (माध्यमिक) यांनी शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांचेकडे सादर करावी. बँक खात्याची माहिती प्राप्त झाल्यानंतर शिष्यवृत्तीचे बॅकेमार्फत वितरण करण्याची जबाबदारी शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक ), पुणे यांचेवर राहील.

१३) <u>गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांचा गौरव -</u>

पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षामध्ये स्पृहणीय यश संपादन करुन राज्यस्तरीय गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी त्यांचा संबधित जिल्हयाच्या मा.पालकमंत्री महोदय यांचे हस्ते दरवर्षी

दिनांक १५ ऑगस्ट रोजी गुणवत्ता प्रमाणपत्र देऊन गुणगौरव करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. सदर सत्कार समारंभ विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेऊन १५ ऑगस्ट रोजी ध्वजारोहणानंतर अथवा त्याच दिवशी स्वतंत्रपणे कार्यक्रम आयोजित करुन करण्यात यावा. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी प्रत्येक वर्षी या परीक्षांच्या राज्यस्तरीय गुणवत्ता यादीमधील विद्यार्थ्यांना देण्यासाठी गुणवत्ता प्रमाणपत्र तयार करुन ती संबधित जिल्हयांच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे विहित कालावधीत उपलब्ध करुन द्यावीत सदर सत्कार समारंभाची सर्व व्यवस्था शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) यांनी करावी.

१४) पूर्व माध्यमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी राज्यातील ग्रामपंचायतीच्या नियंत्रणाखालील सर्व गावे/ वस्ती (लोकसंख्या विचारात न घेता ) तसेच नगरपरिषद, नगरपालिका व महानगरपालिका परिक्षेत्रात ग्रामपंचायत क्षेत्र (अस्तित्वात असल्यास ) असल्यास अशा सर्व गावामधील शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची गणना "ग्रामीण " भागात करण्यात यावी.

१५) पूर्व माध्यमिक शिष्यवृत्तीमध्ये राष्ट्रीय ग्रामीण ( E) सर्वसाधारण ( F ), मुलींसाठी (G ), मागासवर्गीय (H), मागासवर्गीय मुली (I), यामध्ये या शिष्यवृत्तीचे दर व संच प्रपत्र "ई " मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहतील.

१६) माध्यमिक शिष्यवृत्तीमधील तालुकास्तरील शिष्यवृत्तीतील ग्रामीण सर्वसाधारण (A), ग्रामीण अनुसूचित जाती ( B ), ग्रामीण भूमिहीन शेत मजूर ( C ), ग्रामीण आदिवासी ( D ) तसेच राष्ट्रीय ग्रामीण (E), विदर्भासाठी विद्यावेतनमधील सर्व साधारण ( F ), मुलींसाठी ( G ), मागासवर्गीय (H ), मागासवर्गीय मुली ( I ) या शिष्यवृत्तीचे दर व संच प्रपत्र "फ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहतील.

शिष्यवृत्तीच्या सुधारित दराची व संचाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २००९-२०१० मध्ये होणाऱ्या शिष्यवृत्तीच्या परीक्षेसाठी बसणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता करण्यात यावी. सन २००९-१० पूर्वी शिष्यवृत्तीस पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचे नुतनीकरण करताना त्यांना जुन्या दराने तसेच पूर्वीप्रमाणे शिष्यवृत्ती प्रदान करण्यात यावी. सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पात पुरेशी योजनेतर तरतूद करण्यात यावी. या बाबींवर होणारा खर्च त्या त्या शिष्यवृत्यांसाठी खाली दर्शविलेल्या लेखाशीर्षाखाली मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा:-

१) पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती, विदर्भातील विद्यार्थ्यांना विद्यावेतनः-

०२ माध्यमिक शिक्षण (१०७) शिष्यवृत्या (०२) (०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व

पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदाने (२२०२ २३१८) (उच्च माध्यमिक शाळा) ३४ शिष्यवृत्या व विद्यावेतने

२) खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती:-

(०२) खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती (२२०२ ०३५१) (पूर्व माध्यमिक शाळा) ३४ शिष्यवृत्त्या व विद्यावेतने

३) ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिष्यवृत्ती:-

(०२) माध्यमिक शिक्षण (१०७) शिष्यवृत्या (०१) (०१) माध्यमिक शाळातील शिष्यवृत्या (०१) ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिष्यवृत्ती (२२०२ ०३४२) ३४ शिष्यवृत्या व विद्यावेतने.

४) ग्रामीण भागातील हुशार व होतकरु विद्यार्थ्यांना राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती:-

२२०२ सर्वसाधारण शिक्षण (०२) माध्यमिक शिक्षण (१०७) शिष्यवृत्या (०१) (०१) माध्यमिक शाळातील शिष्यवृत्या (०३) (०२) गुणवत्तापूर्ण विद्यार्थ्यांना सहाय्य (२२०२ ०३८९) ग्रामीण भागातील हुशार व होतकरु विद्यार्थ्यांना राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती ३४ शिष्यवृत्या व विद्यावेतने.

यासाठी होणाऱ्या अतिरिक्त खर्चाची तरतूद सन २००१०-११ च्या अर्थसंकल्पात होण्यासाठी शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आयुक्त, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांचेकडून प्रस्ताव प्राप्त करुन त्यांच्या अभिप्रायासह शासनास सादर करावा.

या शासन निर्णयान्वये, यापूर्वीचे पूर्व माध्यमिक/ माध्यमिक गुणवत्ता शिष्यवृत्तीबाबतचे सर्व शासन निर्णय/ परिपत्रक/ शासन पत्र अधिक्रमीत करण्यात येत आहेत.

हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक : ३०६/ व्यय-५, दिनांक १५/५/२०१० च्या अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

हा शासन निर्णय शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१००७२२१५०६५०००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

22/7/2010

**( अश्विनी देखमुख )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

आयुक्त, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) , जिल्हा परिषद
शिक्षण निरिक्षक (दक्षिण/ उत्तर/ पश्चिम), मुंबई
सर्व वरिष्ठ लेखापरिक्षक (शिक्षण विभाग)
महालेखापाल १ व २ (लेखा परीक्षा) मुंबई / नागपूर
महालेखापाल १ व २ (लेंखा व अनुज्ञेयता) मुंबई/ नागपूर
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
मुंबई लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई
संचालक, लेखा व कोषागार अधिकारी
लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई / पुणे/ नागपूर/ औरंगाबाद
वित्त विभाग/ नगर विकास विभाग/ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग/ आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
निवडनस्ती- कार्यासन केंपुयो

शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक :एससीएच-२००९/(९०/०९)/ केंपुयो, दिनांक २२ जुलै, २०१० चे सहपत्र

## तक्ता - अ

पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती संच संख्या (ग्रामीण )

| जिल्हा | सध्याचे संच | सुधारित मंजूर संच |
|---|---|---|
| बृहन्मुंबई | - | - |
| पुणे | ३३४ | ६९२ |
| रायगड | १४० | २१२ |
| अहमदनगर | २३० | ३८७ |
| सोलापूर | २३४ | ३६८ |
| नाशिक | २५४ | ४७७ |
| ठाणे | २३६ | ७७८ |
| धुळे | १०० | १६४ |
| जळगांव | २४० | ३५२ |
| कोल्हापूर | २०२ | ३३७ |
| रत्नागिरी | १५६ | १६२ |
| सिंधुदुर्ग | ८८ | ८४ |
| सातारा | १९२ | २६९ |
| सांगली | १५४ | २४७ |
| औरंगाबाद | १६२ | २७७ |
| जालना | १०२ | १५४ |
| बीड | १५० | २०६ |
| परभणी | ९४ | १४६ |
| लातूर | १५८ | १९९ |
| उस्मानाबाद | ११८ | १४३ |
| नांदेड | १७२ | २७५ |
| अमरावती | १४८ | २५० |
| बुलढाणा | १२८ | २१३ |
| अकोला | ८४ | १५६ |
| यवतमाळ | १३० | २३५ |
| नागपूर | १८४ | ३९० |
| भंडारा | ७० | १०९ |
| वर्धा | ७० | ११९ |
| चंद्रपूर | १०४ | १९८ |
| गडचिरोली | ८० | ९३ |
| गोंदिया | ७६ | ११५ |
| वाशिम | ५४ | ९७ |
| हिंगोली | ७२ | ९५ |
| नंदुरबार | ७४ | १२५ |
| एकूण | ४,७९० | ८,१२४ |

शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक :एससीएच-२००९/(९०/०९)/ केंपुयो, दिनांक २२ जुलै, २०१० चे सहपत्र

**तक्ता - ब**

पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती संच संख्या ( शहरी )

| जिल्हा | सध्याचे संच | सुधारित मंजूर संच |
|---|---|---|
| बृहन्मुंबई | ७३८ | १,९७७ |
| पुणे | १७० | ५०१ |
| रायगड | ७० | १५३ |
| अहमदनगर | ११४ | २८० |
| सोलापूर | ११४ | २६७ |
| नाशिक | १२४ | ३४६ |
| ठाणे | १२० | ५६३ |
| धुळे | ५० | ११८ |
| जळगांव | १२२ | २५५ |
| कोल्हापूर | ९८ | २४४ |
| रत्नागिरी | ७८ | ११८ |
| सिंधुदुर्ग | ४२ | ६० |
| सातारा | ९६ | १९५ |
| सांगली | ७६ | १७९ |
| औरंगाबाद | ७६ | २०१ |
| जालना | ५० | ११२ |
| बीड | ७६ | १५० |
| परभणी | ६० | १०६ |
| लातूर | ७८ | १४४ |
| उस्मानाबाद | ५४ | १०३ |
| नांदेड | ८० | २०० |
| अमरावती | ७२ | १८१ |
| बुलढाणा | ६६ | १५५ |
| अकोला | ४४ | ११३ |
| यवतमाळ | ६८ | १७१ |
| नागपूर | ९४ | २८२ |
| भंडारा | ३६ | ७९ |
| वर्धा | ३४ | ८६ |
| चंद्रपूर | ५० | १४४ |
| गडचिरोली | ५० | ६७ |
| गोंदिया | ३६ | ८३ |
| वाशिम | २६ | ७१ |
| हिंगोली | २० | ६८ |
| नंदुरबार | ३६ | ९१ |
| एकूण | ३,११८ | ७,८६३ |

शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक :एससीएच- २००९/(९०/०९)/ केंपुयो, दिनांक २२ जुलै, २०१० चे सहपत्र

## <u>तक्ता - क</u>

माध्यमिक शिष्यवृत्ती संच संख्या ( ग्रामीण )

| जिल्हा | सध्याचे संच | सुधारित मंजूर संच |
|---|---|---|
| बृहन्मुंबई | - | - |
| पुणे | ३७४ | ५६६ |
| रायगड | १२० | १७३ |
| अहमदनगर | १९८ | ३१६ |
| सोलापूर | २०२ | ३०२ |
| नाशिक | १८४ | ३९१ |
| ठाणे | २२२ | ६३७ |
| धुळे | ९२ | १३४ |
| जळगांव | २१८ | २८८ |
| कोल्हापूर | १९८ | २७५ |
| रत्नागिरी | १३६ | १३३ |
| सिंधुदुर्ग | ७२ | ६८ |
| सातारा | १८४ | २२० |
| सांगली | १६२ | २०२ |
| औरंगाबाद | १३६ | २२७ |
| जालना | ८८ | १२६ |
| बीड | ११४ | १६९ |
| परभणी | ७८ | १२० |
| लातूर | १३८ | १६३ |
| उस्मानाबाद | ९८ | ११७ |
| नांदेड | १३० | २२६ |
| अमरावती | १५८ | २०४ |
| बुलढाणा | १२४ | १७५ |
| अकोला | ८० | १२८ |
| यवतमाळ | १२८ | १९३ |
| नागपूर | २३४ | ३१८ |
| भंडारा | ६२ | ८९ |
| वर्धा | ८८ | ९७ |
| चंद्रपूर | ९२ | १६२ |
| गडचिरोली | ८० | ७६ |
| गोंदिया | ६६ | ९४ |
| वाशिम | ५० | ८० |
| हिंगोली | ५८ | ७८ |
| नंदुरबार | ६२ | १०३ |
| एकूण | ४,४२६ | ६,६५० |

शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक :एससीएच- २००९/(९०/०९)/ केंपुयो, दिनांक २२ जुलै, २०१० चे सहपत्र

## तक्ता - ड

माध्यमिक शिष्यवृत्ती संच संख्या ( शहरी )

| जिल्हा | सध्याचे संच | सुधारित मंजूर संच |
|---|---|---|
| बृहन्मुंबई | ९०८ | १,६१७ |
| पुणे | १९० | ४१० |
| रायगड | ६२ | १२५ |
| अहमदनगर | १०२ | २२९ |
| सोलापूर | ९८ | २१८ |
| नाशिक | १७२ | २८३ |
| ठाणे | १०८ | ४६१ |
| धुळे | ४६ | ९७ |
| जळगांव | ११२ | २०९ |
| कोल्हापूर | ९६ | २०० |
| रत्नागिरी | ७० | ९७ |
| सिंधुदुर्ग | ३६ | ४९ |
| सातारा | ९२ | १५९ |
| सांगली | ७८ | १४६ |
| औरंगाबाद | ६८ | १६५ |
| जालना | ४४ | ९१ |
| बीड | ५४ | १२३ |
| परभणी | ५० | ८७ |
| लातूर | ७० | ११८ |
| उस्मानाबाद | ४६ | ८४ |
| नांदेड | ६२ | १६३ |
| अमरावती | ७८ | १४८ |
| बुलढाणा | ६६ | १२६ |
| अकोला | ४२ | ९२ |
| यवतमाळ | ६६ | १३९ |
| नागपूर | ११८ | २३१ |
| भंडारा | ३४ | ६५ |
| वर्धा | ४२ | ७० |
| चंद्रपूर | ४४ | ११७ |
| गडचिरोली | ४० | ५५ |
| गोंदिया | ३४ | ६८ |
| वाशिम | २६ | ५८ |
| हिंगोली | १६ | ५६ |
| नंदुरबार | ३२ | ७४ |
| एकूण | ३,२०२ | ६,४३० |

शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक :एससीएच-२००९/(९०/०९)/ केंपुयो, दिनांक २२ जुलै, २०१० चे सहपत्र

## तक्ता - इ

| | शहरी | ग्रामीण | एकूण |
|---|---|---|---|
| पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती संच | ७,८६३ | ८,१२४ | १५,९८७ |
| माध्यमिक शिष्यवृत्ती संच | ६,४३० | ६,६५० | १३,०८० |
| एकूण | १४,२९३ | १४,७७४ | २९,०६७ |

शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक :एससीएच-२००९/(९०/०९)/ केंपुयो, दिनांक २२ जुलै, २०१० चे सहपत्र

**तक्ता - ई**

पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती

जिल्हानिहाय, प्रकारनिहाय मंजूर शिष्यवृत्ती संच

| जिल्हा | राष्ट्रीय ग्रामीण ( मासिक दर रु.५० ) | सर्व साधारण ( मासिक दर रु.२५ ) | मुलींसाठी ( मासिक दर रु.२५ ) | मागासवर्गीय ( मासिक दर रु.२५ ) | मागासवर्गीय मुली (मासिक दर रु.२५ ) |
|---|---|---|---|---|---|
| | E | F | G | H | I |
| बृहन्मुंबई | - | - | - | - | - |
| रायगड | १० | - | - | - | - |
| ठाणे | १० | - | - | - | - |
| पुणे | १० | - | - | - | - |
| अहमदनगर | १० | - | - | - | - |
| सोलापूर | १० | - | - | - | - |
| नाशिक | १० | - | - | - | - |
| धुळे | १० | - | - | - | - |
| जळगाव | १० | - | - | - | - |
| नंदुरबार | १० | - | - | - | - |
| कोल्हापूर | १० | - | - | - | - |
| सातारा | १० | - | - | - | - |
| सांगली | १० | - | - | - | - |
| रत्नागिरी | १० | - | - | - | - |
| सिंधुदुर्ग | १० | - | - | - | - |
| औरंगाबाद | १० | - | - | - | - |
| जालना | १० | - | - | - | - |
| बीड | १० | - | - | - | - |
| परभणी | १० | - | - | - | - |
| हिंगोली | १० | - | - | - | - |
| अमरावती | १० | ५१ | ३ | १४ | १ |
| बुलढाणा | १० | ३५ | १ | १२ | १ |
| अकोला | १० | २० | २ | ७ | १ |
| वाशिम | १० | १३ | १ | ५ | १ |
| यवतमाळ | १० | २२ | ३ | ११ | १ |
| नागपूर | १० | ५८ | ३ | १९ | १ |
| भंडारा | १० | ६ | १ | ५ | १ |
| गोंदिया | १० | ७ | १ | ६ | १ |
| वर्धा | १० | १८ | २ | ६ | १ |
| चंद्रपूर | १० | ७ | १ | ४ | १ |
| गडचिरोली | १० | ६ | १ | ४ | १ |
| लातूर | १० | | - | - | - |
| उस्मानाबाद | १० | - | - | - | - |
| नांदेड | १० | - | - | - | - |
| एकूण | ३३० | २४३ | १९ | ९३ | ११ |

शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक :एससीएच- २००९/(९०/०९)/ केंपुयो, दिनांक २२ जुलै, २०१० चे सहपत्र

## तक्ता - फ

### माध्यमिक शिष्यवृत्ती

### जिल्हानिहाय, प्रकारनिहाय मंजूर शिष्यवृत्ती संच

| | | | | | | विदर्भासाठी विद्यावेतन | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जिल्हा | ग्रामीण सर्वसाधारण ( मासिक दर रु.३० ) | ग्रामीण अनुसूचित जाती मासिक दर रु.३० ) | ग्रामीण भूमिहीन शेतमजूर मासिक दर रु.३० | ग्रामीण आदिवासी मासिक दर रु.३० ) | राष्ट्रीय ग्रामीण (मासिक दर रु.७५ ) | सर्व साधारण (मासिक दर रु.४० | मुलींसाठी (मासिक दर रु.४० | मागासवर्गीय (मासिक दर रु.४० | मागासवर्गीय मुली (मासिक दर रु.४० |
| | तालुका स्तरीय शिष्यवृत्त्या | | | | | | | | |
| | A | B | C | D | E | F | G | H | I |
| बृहन्मुंबई | - | - | - | - | - | - | - | - | - |
| रायगड | ५३ | १७ | ७ | ३ | १० | - | - | - | - |
| ठाणे | ५१ | १६ | २४ | ३३ | १० | - | - | - | - |
| पुणे | ६५ | २० | ३३ | ९ | १० | - | - | - | - |
| अहमदनगर | ६२ | १८ | ३६ | ३ | १० | - | - | - | - |
| सोलापूर | ५४ | १६ | २४ | ० | १० | - | - | - | - |
| नाशिक | ६८ | २० | ३४ | २७ | १० | -- | - | - | - |
| धुळे | २३ | ७ | १६ | ६ | १० | - | - | - | - |
| जळगाव | ६८ | २० | २४ | ९ | १० | - | - | - | - |
| नंदुरबार | २३ | ७ | १५ | १८ | १० | - | - | - | - |
| कोल्हापूर | ५४ | १६ | ३० | ० | १० | -- | - | - | - |
| सातारा | ५३ | १७ | १७ | ० | १० | - | - | - | - |
| सांगली | ४१ | १२ | २५ | ० | १० | - | - | - | - |
| रत्नागिरी | ५५ | १७ | ७ | ० | १० | - | - | - | - |
| सिंधुदुर्ग | ३३ | १० | २१ | ० | १० | - | - | - | - |
| औरंगाबाद | ३८ | ११ | ६ | ० | १० | -- | - | - | - |
| जालना | ३६ | ११ | ७ | ० | १० | - | - | - | - |
| बीड | ४९ | १३ | ७ | ० | १० | - | - | - | - |
| परभणी | ३८ | १२ | ५ | ० | १० | - | - | - | - |
| हिंगोली | २४ | ८ | १० | ० | १० | - | - | - | - |
| अमरावती | ४२ | १४ | २८ | ३ | १० | २८ | ४० | २ | २ |
| बुलढाणा | ४० | १३ | २७ | ० | १० | २१ | २ | २ | १ |
| अकोला | २२ | ७ | १५ | ० | १० | १३ | २ | १ | १ |
| वाशिम | १८ | ६ | १० | ० | १० | ८ | १ | १ | १ |
| यवतमाळ | ४८ | १६ | २४ | १८ | १० | १६ | २ | २ | २ |
| नागपूर | ३९ | १३ | १५ | ३ | १० | ३० | ५ | ३ | २ |
| भंडारा | २४ | ७ | १७ | ३ | १० | ५ | १ | १ | १ |
| गोंदिया | २७ | ९ | १८ | ६ | १० | ६ | १ | २ | १ |
| वर्धा | २८ | ९ | १६ | ० | १० | ८ | २ | १ | १ |
| चंद्रपूर | ४६ | १५ | २५ | २७ | १० | ६ | १ | १ | १ |
| गडचिरोली | ३६ | ११ | १८ | १५ | १० | ४ | १ | १ | १ |
| लातूर | ४२ | १३ | २३ | ० | १० | - | - | - | - |
| उस्मानाबाद | ३० | ९ | १० | ० | १० | - | - | - | - |
| नांदेड | ५९ | १९ | १३ | ६ | १० | - | - | - | - |
| एकूण | १,३८९ | ४२९ | ६०७ | १८९ | ३३० | १४५ | ५८ | १७ | १४ |